**Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)**

VOL- VIII | ISSUE- II | FEBRUARY | 2021 | PEER REVIEW e-JOURNAL | IMPACT FACTOR 7.149 | ISSN 2349-638x

# ग्रामीण भागातील माध्यमिक स्तरावरील ऑनलाईन शिक्षण पद्धतीतील अध्ययन,अध्यापन आणि मूल्यमापनाच्या सद्यस्थितीचा अभ्यास

– स.प्रा.डॉ.अनिल किसन करवर

*स्वामी सहजानंद भारती कॉलेज ऑफ एज्युकेशन, श्रीरामपूर*

**सारांश –**

*कोविड-१९ काळातील ग्रामीण भागातील माध्यमिक स्तराच्या शिक्षण प्रक्रियेचा विचार करता,ही प्रक्रिया जुलै २०२० पासून ऑनलाईन सुरु आहे.शिक्षक–विद्यार्थी ह्या प्रक्रियेत समाधानकारकरीत्या सहभागी आहेत.परंतु चांगले यश त्यांना मिळालेले नाही. ऑनलाईन शिक्षण प्रक्रियेत नेटवर्क प्रॉब्लेम,शिक्षक विद्यार्थ्यांचे तांत्रिक कौशल्य कमी, गरिबी, डोंगराळ भाग,विद्यार्थ्यांवर नियंत्रण नसणे,वैयक्तिक मार्गदर्शन करता न येणे,पालकांची आर्थिक समस्या अशा अनेक समस्या आढळतात.*

*अध्ययन,अध्यापन आणि मूल्यमापन ह्या प्रक्रिया पूर्णत: नाही तर अंशत: घेता येऊ शकतात.ग्रामीण डोंगराळ भागात ही प्रक्रिया ऑनलाईन घेणे अवघड तथा अडचणीचे आहे.संबंधित सर्व मानवी घटकांना तांत्रिक कौशल्य हाताळण्याचे,वापराचे प्रशिक्षण द्यायला हवे.*

***सूचक शब्द –*** *ग्रामीण भाग,माध्यमिक स्तर,ऑनलाइन शिक्षण*

**प्रस्तावना -**

शिक्षण ही अखंड चालणारी प्रक्रिया आहे. ज्ञान मिळवणारा प्रत्येक घटक कोणत्याही परिस्थितीत आपली ज्ञानतृष्णा भागवतच असतो. अर्थात ज्ञान मिळविणारे विद्यार्थी,अध्यापन करणारे शिक्षक कोणत्याही परिस्थितीत आपले काम चालू ठेवतात. कोविड– १९ संक्रमण काळात,लॉकडाऊन मध्ये शिक्षण प्रक्रिया अखंड सुरु ठेवण्याचा प्रयत्न ऑनलाईन पद्धतीने सबंधित मानवी घटकांनी केलेला दिसतो. ही प्रक्रिया ऑनलाईन सुरु असलेली दिसते.परंतु ऑनलाईन शिक्षण पद्धतीतील अनेक अडथळे दूर करण्याकडे माध्यमिक शिक्षकांचा प्रयत्न दिसतो.तांत्रिक कौशल्य शिक्षक,विद्यार्थ्यांजवळ हवे,परंतु ग्रामीण डोंगराळ भागात ही प्रक्रिया अतिशय अवघड झालेली दिसते. फक्त शिक्षण प्रक्रिया सुरु आहे.परंतु यश हे अल्पच आलेले दिसते.ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांच्या अध्ययनात फरक पडतांना दिसतो.

**संशोधन विषयाचे स्वरूप -**

कोविड– १९ संक्रमण काळात संपूर्ण शिक्षण व्यवस्थेचा विचार करता,विद्यार्थी, शिक्षक व पालक संभ्रमात आहेत. परंतु ऑनलाईन शिक्षण पद्धती,विविध दूरदर्शन वाहिन्या,खाजगी चॅनेल्स,ॲप्स यांचा विचार करता शिक्षकाच्या अध्यापनाचे,विद्यार्थ्यांचे अध्ययनाचे प्रयत्न सुरु आहेत.अर्थातच ऑनलाईन अध्ययन,अध्यापन व मूल्यमापन या संदर्भातील सद्यस्थिती,समस्या आणि शिक्षकांनी केलेले उपाय इ.पर्यंत या विषयाचा विचार केलेला आहे.

**संशोधन विषयाची गरज**

अर्थातच ऑनलाईन अध्ययन,अध्यापन व मूल्यमापन या प्रक्रियेतील समस्या काय आहेत ? ह्या समस्यांवर शिक्षक काय उपाय करतात ? किंवा करू शकतात ? ऑनलाईन मूल्यमापन स्थिती काय आहे ? हे जाणून घेण्यासाठी सदर विषयाची गरज वाटली.

**संशोधन विषयाचे महत्व**

ऑनलाईन अध्ययन,अध्यापन व मूल्यमापनातील सद्यस्थिती जाणून, आलेल्या समस्यांचा विचार करून, त्यावरील उपाय सूचविण्यासाठी सदर संशोधन महत्वाचे आहे. कोविड–१९ काळातील ग्रामीण भागातील माध्यमिक शिक्षणाची सद्यस्थिती जाणण्यासाठी हा विषय महत्वाचा आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे**

१ ग्रामीण भागातील माध्यमिक स्तरावरील ऑनलाईन शिक्षणाच्या सद्यस्थितीचा अभ्यास करणे.

२ ग्रामीण भागातील माध्यमिक स्तरावरील ऑनलाईन अध्ययनाच्या सद्यस्थितीचा अभ्यास करणे.

३ ग्रामीण भागातील माध्यमिक स्तरावरील ऑनलाईन अध्यापनाच्या सद्यस्थितीचा अभ्यास करणे.

४ ग्रामीण भागातील माध्यमिक स्तरावरील ऑनलाईन मूल्यमापनाच्या सद्यस्थितीचा अभ्यास करणे.

**पारिभाषिक शब्द व व्याख्या**

१.ग्रामीण भाग– विविध सोयी–सुविधा,दळणवळणाचा अभाव व डोंगराळ भाग

२.माध्यमिक स्तर - प्राथमिक शिक्षणानंतरचे,उच्च माध्यमिक शिक्षणापूर्वीचे आणि इ. ९ ते इ.१० वी इयत्ता असलेला शिक्षण स्तर

३.ऑनलाईन शिक्षण पद्धती– विविध तांत्रिक साधनांचा वापर करून विद्यार्थी अध्ययन,शिक्षक अध्यापन व मूल्यमापन करतात तेव्हा ती पद्धती म्हणजे ऑनलाईन शिक्षण पद्धती होय. ४.अध्ययन– ऑनलाईन / तांत्रिक साधनाचा वापर करून विद्यार्थी शिकतो.

५.अध्यापन– ऑनलाईन

६.तांत्रिक साधनाचा वापर करून शिक्षक शिकवतो.

७.मूल्यमापन दृ ऑनलाईन तांत्रिक साधनाचा वापर करून शिक्षक विद्यार्थ्यांची चाचणी घेतो.

**गृहीतके –**

कोविड– १९ काळात ग्रामीण भागात शिक्षण प्रक्रिया ऑनलाइन सुरू आहे.

**व्याप्ती –**

कोविड–१९चा संसर्ग झालेला संपूर्ण प्रदेश, त्यातील ऑनलाइन शिक्षण सुरु असलेली अध्ययन–अध्यापन,मूल्यमापन प्रक्रिया व सबंधित मानवी घटक

**मर्यादा –**

अहमदनगर जिल्ह्यातील अकोले तालुक्याच्या ग्रामीण भागातील माध्यमिक स्तरावरील माध्यमिक शाळा, आश्रम शाळा यातील ऑनलाइन शिक्षण पद्धती

**जनसंख्या –**

अकोले तालुक्याच्या ग्रामीण भागातील माध्यमिक स्तराचे अध्यापन होत असलेल्या १८माध्यमिक शाळा, २आश्रम शाळा अशा एकूण २० शाळा व त्यातील विद्यार्थी, शिक्षक

**न्यादर्श नमुना निवड व पद्धती –**

ग्रामीण भागातील इयत्ता नववी, दहावीचे शिक्षण देणारी ४ माध्यमिक विद्यालये, १ आश्रम शाळा अशा एकूण ५ शाळा अर्थात २५ टक्के शाळांची निवड यादृच्छिक पद्धतीने केली होती.

**संशोधन साधने –**

प्रश्नावली ( मुख्याध्यापकांसाठी ) वापरण्यात आलेली होती.त्यात एकूण ११ प्रश्न मुक्त, १ प्रश्न बध्द असे एकूण १२प्रश्न विचारण्यात आले होते.

**साधनाची विश्वसनीयता व सत्यता –**

प्रश्नावलीतील प्रश्न उद्दिष्टानुसार तयार करून पीएच. डी.,एम.फिल चे मार्गदर्शक, मुख्याध्यापक यांची मदत घेऊन, त्यांच्या सूचनांचा विचार करून प्रश्नावलीला अंतिम रूप देण्यात आहे.

**संशोधन पद्धती –**

वर्णनात्मक संशोधन पद्धतीतील सर्वेक्षण संशोधन पद्धती ह्या लघु संशोधनासाठी वापरण्यात आलेली होती.

**माहिती संकलन प्रक्रिया –**

ग्रामीण भागातील माध्यमिक शाळांना प्रत्यक्ष भेट देऊन ऑनलाइन शिक्षण पद्धती जाणून घेऊन मुख्याध्यापकांकडून सदर संशोधनाची माहिती प्रश्नावलीद्वारे संकलित करण्यात आली.

**मूल्यांकन पद्धती तथा विश्लेषण –**

शेकडेवारी, सरासरी इत्यादींचा वापर करून उद्दिष्टानुसार प्राप्त माहितीचे विश्लेषण करण्यात आले.

**मुख्य निष्कर्ष – ( साधन व उद्दिष्टानुसार एकत्रित )**

प्रश्नावलीतील प्रश्नांच्या प्राप्त प्रतिसादाचा विचार करून उद्दिष्टानुसार पुढील मुख्य निष्कर्ष मांडण्यात आले.

**निष्कर्ष –**

**उद्दिष्ट क्र. १**

१. कोविड–१९ काळात शासन आदेशानुसार शाळा बंद असूनही सर्वच शाळांमध्ये ऑनलाईन शिक्षण प्रक्रिया जुलै २०२० पासून सुरू झालेली होती.

२. सर्वच माध्यमिक शाळांमध्ये ऑनलाईन अध्ययन, अध्यापन व मूल्यमापन सुरू झालेले होते.

३.ऑनलाइन अध्ययन, अध्यापनासाठी ६१.५६ टक्के विद्यार्थी जॉईन होतात.

४. माध्यमिक स्तरावर शिक्षक ऑनलाईन अध्ययन अध्यापन व मूल्यमापनासाठी गुगल मीट, व्हाट्सअप, मोबाईल, झूम, दूरदर्शन संच आणि गृहभेटी इत्यादी साधने व पद्धती वापरताना आढळतात.

**उद्दिष्ट क्र. २**

५. माध्यमिक स्तरावर ऑनलाईन अध्ययनात पुढील अडचणी तथा समस्या येतात – नेटवर्क समस्या, साधनांची अनुपलब्धता ( १०० टक्के ), गरीबी, जास्त पाल्य एका घरात असणे (१० टक्के ), अँड्रॉइड मोबाइल नसणे ( २० टक्के ),

६. ऑनलाइन अध्ययनातील अडचणींवर माध्यमिक शिक्षक पुढील उपाय करतात – गृहभेटी, ऑफलाइन स्वाध्याय देणे ( १०० टक्के ), स्वयं अध्ययन सूचना देणे ( १० टक्के ), जनजागृती इत्यादी

**उद्दिष्ट क्र.३**

७. माध्यमिक स्तरावर ऑनलाईन अध्यापनात पुढील अडचणी तथा समस्या येतात – नेटवर्क समस्या, तांत्रिक कौशल्याचा अभाव ( ८० टक्के ), पालक विद्यार्थी यांच्याकडे अँड्रॉइड मोबाइल नसणे ( २० टक्के )

८.माध्यमिक स्तरावरील ऑनलाईन अध्यापनातील अडचणी वर माध्यमिक शिक्षक पुढील उपाय करतात – तांत्रिक कौशल्य आत्मसात करणे ( ६० टक्के ), विद्यार्थी शिक्षक यांना प्रशिक्षण देणे ( २० टक्के ), गृहभेटी, स्वाध्याय लेखन उपक्रम ( २० टक्के )

**उद्दिष्ट क्र.४**

९.माध्यमिक स्तरावरील ६० टक्के शिक्षक ऑनलाईन मूल्यमापन करतात.

१०.माध्यमिक स्तरावरील मूल्यमापनातील अडचणी तथा समस्या – परीक्षार्थींवर नियंत्रण नाही, सर्व विद्यार्थी एकाच वेळी भेटत नाही, सर्व विद्यार्थ्यांचे मूल्यमापन करता येत नाही ( १०० टक्के ), उत्तर पत्रिका तपासता येत नाही (२० टक्के ), विद्यार्थी प्रतिसाद कमी (२० टक्के )

११.ग्रामीण भागाच्या माध्यमिक स्तरावरील शिक्षक मूल्यमापनातील अडचणी तथा समस्यांवर पुढील उपाय करताना आढळतात – ऑफलाइन नोट्स देणे, गृहभेटी, पालक भेटी ( ७० टक्के ), वेळेचे बंधन असलेली चाचणी घेणे ( ४० टक्के ), आवश्यक पाठ्यांश अगोदर देणे ( २० टक्के ), विद्यार्थ्यांना ऑनलाइन मूल्यमापन समजावून सांगणे, तांत्रिक साधनांचा मूल्यमापनात वापर करणे ( १० टक्के )

१२.ग्रामीण भागातील माध्यमिक स्तरावरील अध्ययन,अध्यापन आणि मूल्यमापनाविषयी माध्यमिक शिक्षक तथा मुख्याध्यापक पुढील गोष्टी सांगतात – नेटवर्क कनेक्टिविटी नसल्याने समाधानकारक परिणाम दिसत नाही (६० टक्के ), सर्वांना मोबाइल व तंत्रज्ञान अवगत हवे ( ४० टक्के ), ग्रामीण भागात ऑनलाईन शिक्षणपद्धती प्रभावी नाही (२०टक्के), विद्यार्थी,पालक, शिक्षक यांना ही पद्धती सोयीची वाटत नाही, त्यात अनेक अडचणी येतात वेगवेगळे शैक्षणिक ॲप्स विकसित करावे लागतील ( १० टक्के ).

**शिफारशी / उपाय –**

१. ग्रामीण भागातील शिक्षकांना मोबाईल वापराचे तथा तांत्रिक साहित्य वापराचे प्रशिक्षण द्यायला हवे.

२. ग्रामीण भागातील पालक विद्यार्थी यांना मोबाईल वापरतात तांत्रिक साहित्य वापराची माहिती द्यावी.

३.स्वाध्याय, गृहभेटी, ऑफलाइन अध्यापन यांचा जास्तीत जास्त वापर व्हावा.

४. नेटवर्क कनेक्टिविटी, मोफत नेटवर्क इत्यादींची शासनाने पूर्तता / सोय / पाठपुरावा करावा.

५. किमान अध्ययन घटक निश्चित करून त्याचे अध्यापन करावे.

६.मूल्यमापनासाठी तांत्रिक साहित्याविषयी शिक्षकांचे, विद्यार्थ्यांचे उदबोधन व्हावे.

**समारोप –**

कोविड–१९या संसर्गजन्य आजारामुळे ग्रामीण भागातील शिक्षणाच्या सर्वच स्तरावरील ऑनलाइन शिक्षण ही आजच्या काळाची ही गरज बनली आहे. विद्यार्थी शारीरिकदृष्ट्या शाळेत नसले तरी ऑनलाईन शिक्षण पद्धतीद्वारे अध्ययन,अध्यापन आणि मूल्यमापन ह्या प्रक्रिया समाधानकारक पूर्ण करता येतात असे संशोधनावरून दिसून येते.

परंतु ग्रामीण भागातील ऑनलाईन शिक्षण पद्धती हा शिक्षण प्रक्रियेसाठी एक सर्वसाधारण पर्याय म्हणता येईल.सर्व शिक्षण ऑनलाइन पद्धतीने देणे / घेणे अवघड आहे, असे संशोधनाद्वारे दिसून येते. यातील विद्यार्थ्यांचे अध्ययन, शिक्षकांचे अध्यापन आणि मूल्यमापन प्रक्रिया राबवतांना अल्पसा प्रतिसाद मिळताना दिसतो.परंतु ही प्रक्रिया अनेक तांत्रिक अडचणी,वेळ,गरिबी यांमुळे यशस्वी होऊ शकत नाही.

**संदर्भ –**

१. कदम चा .म.,चौधरी बा.आ.( १९९२),शैक्षणिक मूल्यमापन पुणे,नूतन प्रकाशन

2. Chauhan, S.S. (2009). *Innovations in Teaching Learning Process*, Noida : Vikas Publishing House Pvt. Ltd.

3. Singh, Y.K. (2010). *Instructional Technology in Education*, New Delhi : A P H Publishing Corporation.

4. Yeole Seema (2007) *Shekshnik Tantravidnyan Ani Mahiti Tantravidnyan* ,Pune; Nityanutan Prakashan

5. Chavan Kishor (2008), *'Information Communication Technology and Education'*, Nasik, Insight Publication..